# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक ०७/०५/२०२२ (शनिवार)**

**(सकाळ)**

---

### चोरी

**पो.स्टे. एमआयडीसी बोरी** :– अंतर्गत ०४ कि.मी. अंतरावरील विक्तुबाबा देवस्थान टाकळघाट चे पुणेवार ले आउट मागे दक्षिण येथे दिनांक २८/०४/२०२२ चे १०.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– नितीन भाउराव चुटे वय ३० वर्ष रा. र एम पी माडवे कंन्ट्रक्शन कंपनी, नागपुर महाराष्ट्र जिवन प्राधिकरण प्रोजेक्ट ह.मु. बाचेवाडी पोस्ट मासाळ ता.पवनी जि.भंडारा यांचे एमपी मांडवे कंन्ट्रक्शन कंपनी कडुन महाराष्ट्र जिवन प्राधिकरण योजने अंतर्गत पाण्याचे टाकीचे काम सुरु असुन पाण्याचे टाकीचे पाहनी केली टाकीचे वॉल नट बोल्ट काढलेले दिसले. इतर विचारपुस केली असता. १) वॉल १०० एमएम किंमती ५३८५/–रु २) ०२ वॉल १५ एमएम किंमती १२७२०/–रु ३) ०१ टी १००X१५० एमएम तसेच १५०X१५०एमएम तीन्ही किंमती ९,४५०/–रु. असा एकुण कि. २७,५५५/–रु. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार शेख मो.क्र. ९९२३७४०२४० हे करीत आहे.

### अपघातात मृत्यु

**पो.स्टे. कोंढाळी** :– अंतर्गत ०७ कि.मी. अंतरावरील मौजा रिंगणाबोडी शिवार येथे दिनांक ०६/०५/२०२२ चे ०२.३० वा. सुमारास आरोपी नामे– रंगनाथ रामलाल यादव(मृतक) वय २७ वर्ष रा.रिवा जिल्हा मध्यप्रदेश हा नागपूर ते अमरावती कडे जात असता त्याने आपले ताब्यातील एम.एच–४०/ए.एके–२७१७ क्रमांकाचा टाटा आयसर क्र ४०९ ट्रक हे रॉग साईडने जात असता वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन अमरावती वरून नागपूर कडे येणाऱ्या जी.जे– ०५/सी.यू– ३८७७ क्रमांकाच्या अशोक लेलॅन्ड गाडीला समोरून धडक दिली. या अपघातात ट्रक मधील चालकास गंभीर जखमी होण्यास व स्वताच्या मरणास आरोपी कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी सरतर्फे सफौ दारासिंग राठोड पोस्टे कोंढाळी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३३७, ३३८, ३०४ (अ) भादवी सहकलम १८४, १२२, १७७ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री राम ढगे मो नं. ९५१८९७९४९९ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**